# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 07.11.2025** **वार- शुक्रवार**

---

**वंदेमातरम**

'वंदे मातरम' गीतास आज दीडशे वर्ष पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर देशात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. पुण्यात जिल्हाधिकारी कार्यालयात 'वंदे मातरम' गीताचं सामूहिक गायन करण्यात आलं. अपर जिल्हाधिकारी सतीश राऊत यावेळी उपस्थित होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत नवी दिल्लीत झालेला मुख्य कार्यक्रमाचं दुरस्थ पध्दतीने जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत प्रक्षेपण झालं. जिल्ह्यातील सर्व महानगरपालिका, नगरपालिका, तहसील कार्यालयं, पोलीस आयुक्तालयं, जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयं, शासकीय-निमशासकीय कार्यालयं, शाळा, महाविद्यालयात वंदे मातरम गीताचं सामूहिक गायन करण्यात आलं, वंदेमातरमला समर्पित विशेष सभा, निबंध स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, पोस्टर तयार करणे आदी उपक्रम राबविण्यात आले. आकाशवाणीच्या पुणे केंद्रातही अधिकारी कर्मचाऱ्यांनी वंदे मातरम गीताचं सामूहिक गायन केलं.

पुण्यातल्या खडकी शिक्षण संस्थेच्या टिकाराम जगन्नाथ महाविद्यालय, सी के गोयल कनिष्ठ महाविद्यालय आणि विविध शाखांच्या विद्यार्थी शिक्षक प्राध्यापकांनी सामुहिक गायन करत वंदे मातरम् या अजरामर गीताचा शतकोत्तर सुवर्ण महोत्सव साजरा केला. वंदे मातरम गीताला दीडशे वर्ष पूर्ण होण्याच्या पूर्वसंध्येला स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर इतिहास प्रेमी मंडळ आणि ज्ञानप्रबोधिनी प्रशालेनं संयुक्तपणे भव्य दीपोत्सवाचं आयोजन केलं होतं. प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्रा. डॉ.न. म. जोशी, इतिहासप्रेमी मंडळाचे अध्यक्ष मोहन शेटे आदी उपस्थित होते.मैदानावर वंदे मातरम् ही अक्षरे रेखाटण्यात आली होती. सुमारे दीड हजार पणत्यांच्या प्रकाशात परिसर उजळून निघाला होता. भारतमातेच्या प्रतिमेचं पूजन करण्यात आलं. सुमारे 500 विद्यार्थ्यांनी यावेळी वंदे मातरम् गीताचे समूहगान सादर केलं.

**सोडत**

पुणे महापालिका निवडणुकीसाठी येत्या मंगळवारी 11 नोव्हेंबर रोजी प्रारूप आरक्षण सोडत जाहीर होणार आहे. तर 2 डिसेंबर रोजी अंतिम आरक्षण सोडत जाहीर होणार आहे. पुणे महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी नगरसेवकांची संख्या 165 असून, 41 प्रभाग आहेत. त्यापैकी 40 प्रभाग चार सदस्यीय, तर 38 क्रमांकाचा आंबेगाव - कात्रज प्रभाग पाच सदस्यीय आहे. 165 नगरसेवकांच्या जागांपैकी 50 टक्के जागा महिलांसाठी राखीव आहेत.

**याद्या**

राज्य निवडणूक आयोगानं आगामी महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदार यादीचा सुधारित कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार पिंपरी चिंचवड महापालिकेसह राज्यातल्या 29 महापालिकांची प्रारूप मतदार यादी 14 नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे. यादीवर हरकती आणि सूचना दाखल करण्याची अंतिम तारीख 22 नोव्हेंबर असणार आहे.  प्राप्त हरकती आणि सूचनांवर निर्णय घेऊन प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या 6 डिसेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

**कारवाई**

जिल्हा परिषदेच्या दिव्यांग शिक्षकांच्या प्रमाणपत्रांच्या फेरतपासणीत 46 शिक्षकांचे दिव्यांगत्वाचे प्रमाण हे 40 टक्क्यांहून कमी असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे जिल्हा परिषद या शिक्षकांवर शिस्तभंगाची कारवाई करणार आहे. अजून 314 शिक्षकांच्या प्रमाणपत्रांची फेरतपासणी शिल्लक आहे.जिल्हा परिषदेच्या शिक्षकांच्या बदली प्रक्रियेत शिक्षक बनावट दिव्यांग प्रमाणपत्र घेऊन बदलीचा फायदा घेत असून या सर्वांची फेरतपासणीची मागणी विविध संघटनांनी केली होती. त्यानुसार ही फेरतपासणी होत आहे.

**कार्तिक-वारी**

आळंदीत होणाऱ्या कार्तिक वारीसाठी पोलिस प्रशासनाकडून नियोजन पूर्ण झाले आहे. आळंदी परिसरात 12 ते 18 नोव्हेंबर या काळात वारीसाठी राज्यभरातून साडेचारशे दिंड्यांसह सुमारे पाच लाख वारकरी येतात. या वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी विविध प्रतिबंधात्मक नियम लागू केल्याची माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक भीमा नरके यांनी दिली आहे.

**बिबट्या**

ऊसतोडणी हंगामात बिबट्याच्या हालचालींचा वाढता धोका लक्षात घेऊन, साखर आयुक्तालयाने सर्व सहकारी आणि खासगी साखर कारखान्यांना ऊसतोड कामगारांच्या सुरक्षेसाठी विशेष उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या आहेत. ऊसतोडणी कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांनी समूहाने काम करावे तसंच बिबट्याचा अधिवास असलेल्या भागातल्या ऊसक्षेत्रात वनविभागानं जनजागृती, त्याचबरोबर आवश्यक उपाययोजना करण्याची सूचना देण्यात आल्याचं साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांनी सांगितलं.

**कार्यक्रम**

ज्येष्ठ इतिहास संशोधक आणि शिवचरित्रकार गजानन भास्कर तथा गजाभाऊ मेहेंदळे स्मृती संकल्प सभेचं येत्या रविवारी फर्ग्युसन महाविद्यालयाच्या ॲम्फीथिएटर मध्ये आयोजन केरण्यात आलं आहे. भारत इतिहास संशोधक मंडळात गजाभाऊंच्या नावाने "गजानन मेहेंदळे मराठा इतिहास अध्यासन केंद्र" स्थापन करण्यात येणार आहे. अशी माहिती भारत इतिहास संशोधक मंडळाचे अध्यक्ष माजी खासदार प्रदीप रावत यांनी काल पत्रकार परिषदेत दिली.

**तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**